# प्रेस नोट

## दिनांक १६/०६/२०२२

| | | |
|---|---|---|
| १ | युनिटचे नाव | लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती घटक |
| २ | आरोपीचे नाव, हुददा, वर्ग व कार्यालयाचा पत्ता | आलोसे क्रं १) श्री.अनंत रामभाऊ पाटणे वय— ५१ वर्षे व्यवसाय— नोकरी पद— आदिवासी विकास निरीक्षक वर्ग—३ प्रकल्प अधिकारी एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प,धारणी रा. अमर कॉलनी,दस्तुर नगर, अमरावती<br>आलोसे क्रं २) श्री.रावसाहेब मल्लु नागराळे वय— ३६ वर्षे व्यवसाय— नोकरी पद— प्राथमीक शिक्षक वर्ग—३ प्रकल्प अधिकारी एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प,धारणी रा. मु. पो.तडखेल ता.देगलुर जि. नांदेड ह.मु कंवर नगर, अमरावती. |
| ३ | अपराध घडला तारीख व वेळ व ठिकाण | दि.०४/०४/२०२२ २१:२४ वा. ते २२:१० वा.दरम्यान<br>दि.२४/०६/२०२२ १४:३३ वा. ते १५:१९ वा.दरम्यान |
| ४ | मागणी केलेली रक्कम | आलोसे क्रं.१ यांनी २०,०००/— रुपये<br>आलोसे क्रं.२ यांनी २५,०००/— रुपये |
| ५ | घटनास्थळ | जशन रेस्टो बार, दस्तुर नगर अमरावती<br>एकात्मीक आदिवासी विकास प्रकल्प, कार्यालय धारणी |

यातील तक्रारदार यांनी दिनांक ३०/०३/२०२२ रोजी समक्ष अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती येथे येवुन तक्रार दिली की, तक्रारदार हे डेप्युटेशन वर आदिवासी मुलांचे वस्तीगृह अमरावती येथे कार्यरत असुन निरीक्षक श्री.अनंत पाटणे हे त्यांना त्यांचा वरीष्ठांना प्रतिकुल शेरा पाठवुन मुळ आस्थापनेवर परत करतो अशी भिती घालुन वरीष्ठांना रिपोर्ट न पाठवण्यासाठी २०,०००/—रु लाचेची मागणी करीत आहे.

त्यावरुन दिनांक ०४.०४.२०२२ रोजी पंचासमक्ष करण्यात आलेल्या पडताळणी कार्यवाही दरम्यान श्री.अनंत पाटणे यांनी तक्रारदार यांना त्यांचा वरीष्ठांना प्रतिकुल शेरा पाठवुन त्यांच्या मुळ आस्थापनेवर परत करतो अशी भिती घालुन तक्रारदार यांचा वरीष्ठांना रिपोर्ट न पाठवण्यासाठी २०,०००/—रु लाचेची मागणी करून प्रत्येकी तीन महीन्याचे ५,०००/— रु लाच स्विकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले आहे.

दरम्यान तक्रारदार यांचे डेप्युटेशन रदद होवुन त्यांना मुळ आस्थापनेच्या ठिकाणी परत केल्याने दि.१९/०५/२०२२ रोजी सापळा कार्यवाही दरम्यान आरोपी क्रं.१ श्री.अनंत पाटणे यांनी तक्रारदार यांना त्यांचे काम आता त्यांचेकडे नसल्याचे सांगुन लाचेची रक्कम न स्विकारता बदलीचे प्रकरण हे श्री.नगराळे यांच्याकडे असल्याचे सांगुन श्री.नगराळे यांचेशी फोनवर चर्चा केली व सदर लाचेची रक्कम ही श्री.नगराळे यांना देण्याबाबत तक्रारदार यांना प्रोत्साहन देवुन बदली संबंधाचे काम श्री.नगराळे यांच्या कडुन करून घेण्याचे सांगीतले.

त्यावरून दि.२४/०५/२०२२ रोजी एकात्मिक आदिवासी प्रकल्प कार्यालय, धारणी येथे करण्यात आलेल्या पडताळणी क्रं.२ कार्यवाही दरम्यान आरोपी क्रं.२ श्री.रावसाहेब नगराळे यांनी तक्रारदार यांना त्यांचे बदलीचे काम करून देण्यासाठी २५,०००/—रु लाचेची मागणी करून लाच स्विकारण्याचे मान्य केले. त्यानंतर आरोपी यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने त्यांचेकडुन लाचेची रक्कम स्विकारली नाही. त्यावरून वर नमुद आरोपी यांना ताब्यात घेण्यात आले असुन त्यांचेविरुध्द गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरु आहे.

सदरची कार्यवाही मा.श्री.विशाल गायकवाड, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.अरूण सावंत, अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती, श्री.देविदास घेवारे अपर पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती परिक्षेत्र, अमरावती व श्री.संजय महाजन, पोलीस उपअधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, अमरावती यांचे मार्गदर्शनाखाली आम्ही पोलीस निरीक्षक अमोल कडु, पोलीस निरीक्षक श्री.प्रविण पाटील म.पो.ह. माधुरी साबळे, म.पो.ह. खंडारे, ना.पो.कॉ. युवराज राठोड, निलेश महींगे, पो.कॉ.शैलेश कडू, चालक सपोउपनि.सतिश किटुकले व प्रदिप बारबुध्दे यांनी पार पाडली. नागरीकांनी अशाच प्रकारे भ्रष्टाचारा संबंधी तक्रार देण्यासाठी पुढे यावे असे आवाहन करण्यात येत आहे.

ऑफीस फोन नं.०७२१—२५५२३५५, २५५३०५५

टोल फ्रि नंबर —१०६४.

(अमोल वि. कडु)
पोलीस निरीक्षक
अॅन्टी करप्शन ब्युरो, अमरावती

Scanned with CamScanner